महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६
ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे

क्र. : १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२०-२१/ ४९
दिनांक : 15 FEB 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- सन २०१८-१९ पासून महाडीबीटी प्रणालीवर राबविण्यात येणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता केंद्र व राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शक सूचना.

संदर्भ :- विजाभज, इमाव, व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय यांचे शासन परिपत्रक क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र./शिक्षण, दि. १९ जानेवारी, २०१९.

उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकान्वये, केंद्र व राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती योजना, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इत्यादींच्या अंमलबजावणीबाबत विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडून परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी सदर शासन परिपत्रकातील नमूद मुद्यांचे काटेकोरपणे अनुपालन करण्यात यावे व आपल्या अखत्यारित असलेल्या शैक्षणिक संस्थांना याबाबत माहिती करून देण्यात यावी व त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत सुचित करण्यात यावे, हि विनंती. सदर शासन पत्राची प्रत या कार्यालयाने आपणांस खालील विभागवार ई-मेल पत्त्यावर पाठविलेली आहे.

१) romumbai@dtemaharashtra.gov.in
२) ropune@dtemaharashtra.gov.in
३) ronashik@dtemaharashtra.gov.in
४) roaurangabad@dtemaharashtra.gov.in
५) roamravati@dtemaharashtra.gov.in
६) ronagpur@dtemaharashtra.gov.in

**सहसंचालक तंत्र शिक्षण**
**विभागीय कार्यालय, नागपूर.**
आवक ...1147...

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/शैवि/महाडिबीटी/२०२१/ 731
दिनांक :- 4 MAR 2021

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय,अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था, नागपूर विभाग,
नागपूर .

संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, उपरोक्त विषयासंबंधी विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडून शासनस्तरावरुन आदेश निर्गमित करण्यात आलेला असून सदर शासन पत्रानुसार संस्थांस्तरावर कार्यवाहीची अंमलबजावणी करण्यांत यावी. (संदर्भिय शासन परीपत्रक संलग्न)

(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६
ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे

क्र. : १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२०-२१/ ४९
दिनांक : 15 FEB 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

**विषय :-** सन २०१८-१९ पासून महाडीबीटी प्रणालीवर राबविण्यात येणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता केंद्र व राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शक सूचना.

**संदर्भ :-** विजाभज, इमाव, व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय यांचे शासन परिपत्रक क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र./शिक्षण, दि. १९ जानेवारी, २०१९.

उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकान्वये, केंद्र व राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती योजना, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इत्यादींच्या अंमलबजावणीबाबत विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडून परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी सदर शासन परिपत्रकातील नमूद मुद्यांचे काटेकोरपणे अनुपालन करण्यात यावे व आपल्या अखत्यारित असलेल्या शैक्षणिक संस्थांना याबाबत माहिती करून देण्यात यावी व त्याची अंमलबजावणी करण्याबाबत सुचित करण्यात यावे, हि विनंती. सदर शासन पत्राची प्रत या कार्यालयाने आपणांस खालील विभागवार ई-मेल पत्त्यावर पाठविलेली आहे.

१) romumbai@dtemaharashtra.gov.in
२) ropune@dtemaharashtra.gov.in
३) ronashik@dtemaharashtra.gov.in
४) roaurangabad@dtemaharashtra.gov.in
५) roamravati@dtemaharashtra.gov.in
६) ronagpur@dtemaharashtra.gov.in

**सहसंचालक तंत्र शिक्षण**
**विभागीय कार्यालय, नागपूर.**
आवक ... 1147 .....
दिनांक ... 25 FEB 2021 ...

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.

सन २०१८-१९ पासून महाडिबीटी प्रणालीवर राबविण्यात येणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता केंद्र व राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र.४५/शिक्षण**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १९ जानेवारी, २०१९.

वाचा :- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग (मातं) क्रमांक मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/एस-१/ ३९, दि.१२.१०.२०१८
२) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. शुनिप्रा/डिबीटी/ १४९८/२०१८, दि.१२.११.२०१८.

**परिपत्रक :-**

राज्यातील कल्याणकारी योजनांचे लाभ, आर्थिक सहाय्य आणि सेवा यांचे वितरण करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने थेट लाभ हस्तांतरण (महाडिबीटी) प्रणाली विकसित केली असून, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून पहिल्या टप्प्यात एकूण सहा प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त असलेल्या केंद्र व राज्य पुरस्कृत मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती इ. ३९ योजनांची अंमलबजावणी महाडिबीटी प्रणालीमधून करण्यास व त्याबाबतची कार्यपध्दती विहित करण्यास माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि.१२.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

२. माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने सदरहू शासन निर्णयान्वये अर्जदाराने महाडिबीटी प्रणालीवर अर्जाची नोंदणी करण्यापासून ते पात्र लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये देय लाभ अदा करण्यापर्यंतची कार्यपध्दती विहित केलेली आहे. त्यामध्ये क्षेत्रीय अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चितपणे विहित केलेली नसल्याने ती विहित करण्याबाबत विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून विचारणा होत असल्याने, त्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तद्नुषंगाने खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

३. विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना, व्यावसायिक पाठयक्रमांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत महाडिबीटी प्रणालीवर विद्यार्थ्यांनी नोंद केलेल्या अर्जांबाबत सर्व संबंधित सक्षम प्राधिकारी यांची जबाबदारी पुढील प्रमाणे राहील:-

(१) महाडिबीटी प्रणालीवर महाविद्यालय/ अभ्यासक्रमाचे मॅपिंग करण्याची, महाविद्यालयनिहाय मंजूर अभ्यासक्रम व त्याची मंजूर प्रवेशक्षमता अपलोड करण्याची व ती वेळोवेळी अद्ययावत करण्याची तसेच त्याबाबत ऑनलाईन तपासणी करण्याची जबाबदारी ही संबंधित प्रशासकीय विभागाची राहणार आहे. तसेच भविष्यात पोर्टलवर नोंद झालेले महाविद्यालय प्रत्यक्षात बंद झाल्यास / अभ्यासक्रम बंद झाल्यास /महाविद्यालयाची मान्यता काढून घेण्यात आल्यास त्यानुषंगाने पोर्टलवर आवश्यक ते बदल / दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही देखील

संबंधित प्रशासकीय विभागांचीच आहे. त्यामुळे सर्व संबंधित सहायक आयुक्तांनी महाडिबीटी पोर्टलवर विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील अर्ज मंजूर करताना संबंधित महाविद्यालयाच्या अधिनस्त प्रणालीवर मंजूर अभ्यासक्रम व मंजूर प्रवेश क्षमता विचारात घ्यावी. त्यामध्ये काही संभ्रम निर्माण झाल्यास सदर बाब संचालनालयामार्फत संबंधित प्रशासकीय विभागाच्या निदर्शनास आणावी. तसेच योजनेच्या निकषानुसार मंजूर अभ्यासक्रम महाडिबीटी प्रणालीअंतर्गत समाविष्ट झालेला नसल्यास विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी लाभापासूचन वंचित राहू नयेत, म्हणून सदर अभ्यासक्रम तातडीने प्रणालीवर अपलोड करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडे सादर करावा.

(२) विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांने महाडिबीटी प्रणालीचा वापर करुन ऑनलाईन नोंद केलेला अर्ज व त्यापृष्ठयर्थ प्रणालीवर अपलोड केलेली खालील मूळ कागदपत्रे योजनेच्या निकषांच्या आधारे तपासून, खातरजमा व पडताळणी करुन महाडिबीटी प्रणालीवरुन संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे ऑनलाईन फॉरवर्ड करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय/ महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

(अ) विद्यार्थ्यांच्या जातीचे प्रमाणपत्र (फक्त नवीन {Fresh} प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता),
(ब) व्यावसायिक अभ्यासक्रमातील विहित केलेल्या अभ्यासक्रमाकरीता जातवैधता प्रमाणपत्र,
(क) मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा पुरावा /गुणपत्रिका, (ज्या अभ्यासक्रमांना कॅरी ऑन तत्वावर पुढील वर्षात प्रवेश मिळाला आहे, त्यांनी केवळ गुणपत्रिका जोडावी.)
(ड) मागील उत्तीर्ण अभ्यासक्रमाच्या शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा दाखला (L.c./T.c)
(इ) सत्रातील विद्यार्थ्यांची ७५% पेक्षा जास्त उपस्थिती असल्याबाबतचे प्रमाणपत्र,
(ई) उत्पन्नाचा दाखला (भा.स. मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी फक्त नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता तसेच नुतनीकरणाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या वर्षातील उत्पन्नाचा दाखला)
(उ) आधारकार्डची प्रत,
(ऊ) बँकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत,
(ए) बँकेकडून आधार संलग्न झाल्याचे स्लिप/ पोहच पावती,
(ऐ) आवश्यकता असेल तेथे गॅप प्रमाणपत्र.

(३) वर नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे ही विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत करत असताना अपलोड करावयाची आहेत. तसेच सदरील अपलोड केलेली कागदपत्र व त्यातील मजकूर संपूर्णत: सत्य व खरा असल्याची खात्री करण्याची जबाबदारी ही संबंधित विद्यार्थी व त्याच्या पालकांची असेल

(४) संबंधित महाविद्यालयाने ऑनलाईन फॉरवर्ड केलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण यांच्या लॉगिनमध्ये आल्यानंतर प्रणालीमध्ये अपलोड करण्यात आलेल्या स्वयंसाक्षांकित कागदपत्रांपैकी, विद्यार्थ्यांची पात्रता, जातीचा दाखला, आवश्यकतेनुसार जात वैधता प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला व पात्र अभ्यासक्रम इ. बाबींची कागदपत्रे संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी योजनेच्या निकषाच्या आधारे तपासून महाडिबीटी प्रणालीवरील अर्ज नियमानुसार मंजूर अथवा नामंजूर करावेत.

(५) व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीचे विहित शैक्षणिक शुल्क व विकास निधी हे शुल्क नियामक प्राधिकरण (एफ.आर.ए.) व तत्सम प्राधिकरणाकडून निश्चित केले जाते. तसेच पारंपारिक अभ्यासक्रमांसाठीचे विहित शैक्षणिक शुल्क, इतर शुल्क व परीक्षा शुल्क इ. हे संबंधित प्रशासकीय विभाग, विद्यापीठ, शैक्षणिक (कृषी, परिचारीका इ.) परिषदा या सक्षम प्राधिकरणाकडून निश्चित केले जाते. त्यानुसार महाडिबीटी प्रणालीवर सदरील शैक्षणिक शुल्क, विकास निधी, परीक्षा शुल्क व इतर शुल्क इ. ची रक्कम संबंधित सक्षम प्राधिकरणाने नोंदविलेले आहेत. सबब, महाडिबीटी प्रणालीवरील महाविद्यालयांच्या लॉगिन आयडीवर दर्शविण्यात आलेल्या शुल्क रचनेची खातरजमा करण्याची जबाबदारी ही शुल्क नियामक प्राधिकरणाची राहील. तसेच सदरील शुल्क रचना त्या त्या संबंधित सक्षम प्राधिकरणांमार्फत पुनर्पडताणी करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

(६) सर्व संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी प्रणालीवर अर्ज मंजूर करताना शुल्क नियामक प्राधिकरण व इतर सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेले दर हे अंतिम समजून, त्यानुसार विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्याची कार्यवाही करावी. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाने प्रणालीवर मंजूर केलेल्या शुल्कानुसार लाभ देय राहील, याची नोंद घ्यावी. सदर शुल्काबाबत अपवादात्मक प्रसंगी काही संभ्रम निर्माण झाल्यास सदर बाब अर्ज मंजूर करण्यापूर्वी शुल्क नियामक प्राधिकरण/ त्या त्या संबंधित सक्षम प्राधिकरणास / महाविद्यालयाच्या निदर्शनास आणण्यात यावी. मात्र याकरीता अन्य अर्ज प्रलंबित ठेवू नयेत.

(७) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता महाडिबीटी प्रणालीवर विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करताना संबंधित महाविद्यालयास देय होणारी "इतर फी" ची रक्कम ही पहिल्या सहामाहीऐवजी दुसऱ्या सहामाहीमध्ये एकत्रितरित्या मंजूर करण्यात येणार असून तशी सुविधा प्रणालीवर निर्माण करण्यात आलेली आहे. त्यामुळे पहिल्या सहामाहीतील अर्ज "इतर फी" मुळे प्रलंबित न ठेवता ते नियमानुसार तातडीने निकाली काढावेत.

(८) विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी सदर प्रणालीमध्ये नोंदविलेले अर्ज महाविद्यालयामार्फत सहायक आयुक्त, समाज कल्याण यांच्या लॉगिनमध्ये आल्यानंतर सदर अर्ज तीन दिवसांपेक्षा जास्त दिवस मंजूरी अभावी प्रलंबित राहणार नाही, याची सर्व संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी दक्षता घ्यावी.

(९) सर्व संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता विहित केलेल्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती व निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत विहित केलेल्या अटी, शर्ती, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना व वित्तीय नियमांचा कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(१०) संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, पुणे यांना विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठीच्या योजनांच्या अनुषंगाने महाडिबीटी प्रणाली अंतर्गत तांत्रिकदृष्टया केंद्रीभूत "आहरण व संवितरण अधिकारी तथा समन्वय अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले असले तरी विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना अदा करण्यात येणाऱ्या लाभाच्या रक्कमेच्या वितरण कार्यपध्दती संदर्भातील बदल वगळता, उर्वरित योजनांच्या प्रचलित शासन निर्णयान्वये निर्धारित केलेली अंमलबजावणीची कार्यपध्दती कायम आहे. त्यामुळे महाडिबीटी प्रणालीवरील योजनांच्या अटी व शर्तीनुसार प्रत्यक्षातील अंमलबजावणी, प्राप्त होणाऱ्या अर्जाची पात्रतेची तपासणी, नियमानुसार मंजूरीबाबत संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण हे अंतिमतः जबाबदार राहतील.

(११) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांच्या अधिनस्त असणाऱ्या संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांच्यावर महाडिबीटी प्रणालीअंतर्गत विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील योजनानिहाय अर्ज मुदतीत मंजूर करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते संनियंत्रण ठेवण्याची आणि वरिष्ठ कार्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालये यांच्यात समन्वय ठेवण्याची जबाबदारी सर्व संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांची राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०१२११३०६३५३७२२ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shri Ravindra Gurav
Date: 2019.01.21 13:18:06 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अमुस, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८) सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव, शालेक शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव, शुल्क नियोमक प्राधिकरण, शासकीय तंत्र निकेतर, बांद्रा (पूर्व), मुंबई
११) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१५) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे
१६) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१९) सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण.
२०) निवड नस्ती.